दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शनिवार , 10 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 148 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# सामाजिक उत्तरदायित्वाचा निधी प्रदूषण नियंत्रणासाठी वापरावा : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

■ मुंबई : प्रतिनिधी

जालना शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण नियंत्रणासाठी लोखंड उत्पादन व भंगार पुनर्प्रक्रिया उद्योगांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या उपाय योजनांचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करून त्याच्या अंमलबजावणीसाठी लघु, मध्यम व दीर्घ मुदतीची कालमर्यादा निश्चित करावी. तसेच प्रदुषण नियंत्रणासंदर्भातील जुन्या यंत्रणा बदलून कालबद्ध पद्धतीने नवीन प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्ययावत कराव्यात, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिले. तसेच कंपन्यांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचा निधीचा वापर प्रदुषण कमी करण्यासाठी प्राधान्याने करावा, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

जालना शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील वाढत्या प्रदूषणाच्या प्रश्नावर पर्यावरणमंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी उद्योग प्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांची आज मंत्रालयातील दालनात बैठक घेतली. यावेळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांच्यासह जालनातील स्टिल उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जालना औद्योगिक परिसरातील अनेक उद्योगांचे प्रकल्प जुने असून लोखंड व स्क्रॅपच्या प्रक्रियेमुळे धूर आणि धूलिकण निर्माण होत आहेत. जुन्या यंत्रणा, अपुरी धूरशोषण व्यवस्था, उद्योग परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरील धूळ, स्क्रॅप हाताळणी तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणेला बायपास करून होणाऱ्या उत्सर्जनासारख्या बाबींवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, प्रदूषणाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता येणार नाही. उद्योग बंद करणे हा अंतिम उपाय नसून उद्योगांनी आपल्या नफ्यातील काही हिस्सा तंत्रज्ञानाच्या आधुनिकीकरणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. जुन्या उत्पादन पद्धती आणि यंत्रणांमुळे या भागातील धूर प्रदूषणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या उद्योगांची यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी करून उद्योग प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर उद्योगांसमोर प्रदूषण नियंत्रणासाठी काही प्रमुख उपाययोजना ठेवण्यात आल्या. स्क्रॅपचे आकारमान कमी करून त्याचा नियंत्रित व सातत्यपूर्ण पुरवठा करण्याची यंत्रणा उभारणे, उत्पादन विभागातील अनावश्यक उघडी जागा बंद करणे, शेडमध्ये योग्य प्रेशर राखणे, धूरशोषणासाठी प्राथमिक व दुय्यम हूडची कार्यक्षमता वाढविणे आणि योग्य धूळ व वायुप्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणे, या उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे.

तांत्रिक किंवा जागेच्या मर्यादांमुळे एखादी उपाययोजना शक्य नसल्यास उद्योगांनी तज्ज्ञ संस्थांकडून व्यवहार्य पर्याय निश्चित करून प्रदूषण नियंत्रण प्राधिकरणाची मान्यता घ्यावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्येक उद्योगाची स्वतंत्र पाहणी व लेखापरीक्षण करावे. धूरगळती, नादुरुस्त यंत्रणा, प्रक्रिया शेडमधील उघड्या जागा, प्रदूषण नियंत्रण प्रणालीला वगळणारे मार्ग आणि धूळ नियंत्रणातील त्रुटी यांची उद्योगनिहाय नोंद करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. या अहवालाच्या आधारे प्रत्येक उद्योगाला स्वतंत्र उपाययोजना आणि कालमर्यादा देण्यात येईल, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. मंडळाने दिलेल्या कालावधीत उद्योगांनी केलेल्या प्रत्यक्ष प्रयत्नांचा विचार पुढील निर्णय घेताना केला जाईल. कामात ठोस प्रगती दिसल्यास आवश्यकतेनुसार मुदतीबाबत विचार केला जाईल; मात्र कोणतीही प्रगती न करणाऱ्या उद्योगांना मुदतवाढ दिली जाणार नाही. अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, पाण्याचे फवारे आणि वाहनांच्या चाकांमधून पसरणारी धूळ रोखण्यासाठी आवश्यक व्यवस्था तातडीने करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उद्योगांनी केलेल्या उपाययोजना आणि प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यासाठी महिनाभरानंतर पुन्हा बैठक घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.



## सीएसआरचा निधी प्रदूषण नियंत्रणासाठी करा

औद्योगिक संस्थांच्या सीएसआर निधीचा वापर प्रदूषण कमी करण्यासाठी करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. केवळ विविध कार्यक्रम, स्पर्धा किंवा इतर उपक्रमांवर निधी खर्च न करता, विद्यमान प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा, पर्यावरणपूरक उपक्रम, जलसंधारण आणि परिसर सुधारणा यावर सीएसआरचा निधी वापरण्याचे आवाहन मुंडे यांनी केले. औद्योगिक परिसरातील खराब रस्त्यांमुळे उडणारी धूळ कमी करण्यासाठी रस्ते सुधारणा, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, जलसंधारण, नदी-नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी श्वसनविषयक आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात यावीत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रदुषण कमी करण्यासाठी काही उद्योगांनी आयआयटी मुंबई, आयआयटी दिल्ली आणि आयआयटी कानपूरमधील तज्ज्ञांशी चर्चा सुरू असल्याचे उद्योग प्रतिनिधींनी यावेळी सांगितले. काही उद्योगांमध्ये धूरशोषण यंत्रणेच्या क्षमतेत वाढ आणि दुय्यम हूडच्या आधुनिकीकरणाचे काम सुरू असून, काही कामे फेब्रुवारी-मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचेही सांगण्यात आले.




## नागरिकांच्या समस्यांकडे वीज वितरण कंपनीचे दुर्लक्ष

# डी.वाय.एफ.आय. चे शहापूर कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन चौथ्या दिवशीही सुरू!

■ शहापूर प्रतिनिधी

### दोन दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास उपविभागीय कार्यालयाला 'टाळा ठोको' आंदोलनाचा इशारा

डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया - (डीवायएफआय) शहापूर तालुका कमिटीच्या वतीने वीज वितरण महावितरणच्या शहापूर उपविभागीय कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत धरणे आंदोलनाचा आज चौथा दिवस मावळला. चार दिवसांच्या कालावधीत आंदोलक आणि प्रशासन यांच्यात तब्बल सहा वेळा चर्चा झाली; मात्र प्रशासनाकडून कोणताही ठोस तोडगा न निघाल्याने आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. आगामी दोन दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास महावितरण कार्यालयाला टाळे ठोकण्याचा सणसणीत इशारा डी.वाय.एफ.आय.च्या वतीने देण्यात आला आहे.

गेल्या काही काळापासून शहापूर तालुक्यामधील मौजे दहिगाव ग्रामपंचायत हद्दीतील तळवाडा, मनाचांबा, तुंबडेपाडा, का हंडोळपोही, बोडण, शिसवली, वरातेपाडा, वडपाडा ह्या गावांना तातडीने वीज पुरवठा करणे, भरमसाठ वीज बिल आकारणी बंद करणे, तालुक्यातील नादुरुस्त विद्युत लाईन दुरुस्त करणे सडलेले पोल, लाईन साफ करणे, या जनविरोधी कारभाराविरोधात आणि स्थानिक समस्यांच्या तातडीने निवारणासाठी डी.वाय. एफ.आय. शहापूर तालुका कमिटीच्या वतीने ६ ऑक्टोबरपासून महावितरणच्या उपविभागीय कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनाला सुरुवात झाली आहे.

आंदोलनाच्या गेल्या चार दिवसांत प्रशासनाने डी.वाय.एफ.आय.च्या प्रतिनिधींशी सहा वेळा चर्चा केली, परंतु प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून कोणतीही सकारात्मक आणि ठोस कारवाई केली गेलेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या आंदोलकांनी प्रशासकीय दिरंगाईचा तीव्र निषेध नोंदवत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा पवित्रा घेतला आहे. "प्रशासन केवळ वेळेकाढूपणा करत आहे. नागरिकांच्या रास्त मागण्यांवर गांभीर्याने विचार न झाल्यास, प्रशासनाला जाग आणण्यासाठी येत्या दोन दिवसांत शहापूर वीज वितरण उपविभागीय कार्यालयाला 'टाळा ठोको' आंदोलन केले जाईल आणि यातून उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी महावितरण प्रशासनाची असेल," असा स्पष्ट इशारा डी.वाय.एफ.आय.च्या तालुका नेतृत्वाने दिला आहे. या आंदोलनात कृष्णा भावर, माकप तालुका सचिव, किसान सभा तालुका अध्यक्ष नंदू खांजोडे, तालुका सचिव संतोष भांगरे सीआयटीयु तालुका अध्यक्ष मनोज विशे, जनवादी महिला संघटनेच्या तालुका सचिव निकिता काकरा, अघई ग्रामपंचायतच्या सरपंच दीपिका अंधेर, आव्हाळे ग्रामपंचायतचे सरपंच चिंतामण निखडा या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. डीवायएफआय राज्य कमिटी सदस्य भरत वळंबा यांनी बेमुदत धरणे आंदोलनात आलेल्या जनतेला संबोधित केले तसेच भास्कर म्हसे यांनी मार्गदर्शन केले. डी.वाय.एफ.आय.चे पदाधिकारी, तालुका अध्यक्ष महेंद्र पाचलकर, सचिव मनोज काकवा, नितीन काकरा, रवींद्र माहुरे, रामदास कोदे, अरुण घाटाळ, दिनेश बरफ,दिलीप रोज, चंद्रकांत वैजल, संतोष बोंड, विश्वास दळवी आदी कार्यकर्ते आणि शहापूर तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले असून मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महागाव तालुक्याची प्रतिष्ठा पणाला !

## विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गात तालुक्यातील दोन उमेदवार आमनेसामने

■ महागाव प्रतिनिधी





राजकीय नेत्यांच्या प्रतिष्ठेचीही कसोटी यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीत विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गातील जागेवर महागाव तालुक्यातीलच दोन उमेदवार आमनेसामने आल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच उत्सुकता निर्माण झाली आहे. महायुती समर्थित पॅनलकडून महेश राठोड, तर महाविकास आघाडी पुरस्कृत पॅनलकडून स्वप्नील नाईक निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने ही लढत केवळ दोन उमेदवारांपुरती मर्यादित राहिलेली नाही. या निमित्ताने स्थानिक राजकीय समीकरणे, नेत्यांचा प्रभाव आणि सहकार क्षेत्रातील संपर्क यांचीही कसोटी लागणार आहे.

या निवडणुकीत राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी स्महेश राठोड यांच्यासाठी ही जागा मिळविण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा आहे. या जागेसाठी मंत्री संजय राठोड आग्रही असल्याचे सांगितले जात होते; मात्र अखेर ही जागा महेश राठोड यांच्या वाट्याला आल्याने राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले. त्यामुळे या निवडणुकीकडे इंद्रनील नाईक यांच्या राजकीय प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे.

दुसरीकडे, यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस जिल्हा बँकेच्या निवडणुकीत उतरली आहे. स्वप्नील नाईक हे ॲड. सचिन नाईक यांचे बंधू असल्याने या लढतीला काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाच्या प्रतिष्ठेचीही किनार लाभली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या पॅनलसाठी ही जागा महत्त्वाची मानली जात आहे.

### दोन घराणी, दोन राजकीय प्रवाह

स्वप्नील नाईल हे फुलसावंगी परिसरातील परिचित नाईक कुटुंबातील असून, हटकर धनगर समाजातील प्रतिष्ठित घराण्याशी त्यांचा संबंध आहे. परिसरातील सामाजिक संपर्क आणि स्थानिक ओळख ही त्यांच्या उमेदवारीच्या चर्चेतील महत्त्वाची बाजू आहे. तर महेश राठोड हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक शिवाजी राठोड यांचे सुपुत्र आहेत. बँकेच्या कामकाजाशी संबंधित कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे त्यांच्या उमेदवारीलाही सहकार क्षेत्रातील संदर्भ लाभला आहे. त्यामुळे या दोन्ही उमेदवारांची पार्श्वभूमी, स्थानिक संपर्क आणि त्यांना मिळणारा राजकीय पाठिंबा हे निवडणुकीतील चर्चेचे प्रमुख मुद्दे ठरत आहेत.

### सहकाराच्या निवडणुकीत राजकीय प्रतिष्ठेची भर

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक ही केवळ पक्षीय राजकारणापुरती मर्यादित नसते. बँकेशी संबंधित मतदारांचे हितसंबंध, सहकार क्षेत्रातील संबंध, स्थानिक नेतृत्वाची पकड आणि पॅनलमधील समन्वय अशा विविध घटकांचा निवडणुकीवर प्रभाव पडू शकतो. महागाव तालुक्यातील दोन उमेदवार एकाच प्रवर्गातून निवडणूक लढवत असल्याने स्थानिक पातळीवरील समीकरणांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे. एकीकडे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याशी संबंधित राजकीय प्रतिष्ठेचा मुद्दा, तर दुसरीकडे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांचे नेतृत्व आणि महेश राठोड यांची सहकार क्षेत्राशी संबंधित पार्श्वभूमी, अशा विविध पैलूंमुळे या लढतीची चर्चा रंगत आहे. अखेरीस, महागाव तालुक्यातील दोन उमेदवारांमधील ही लढत कोणत्या दिशेने जाते, याकडे सहकार क्षेत्रासह जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीत उमेदवारांची वैयक्तिक ओळख, मतदारांशी असलेला संपर्क आणि प्रत्यक्ष प्रचारातील कामगिरी यांना किती महत्त्व मिळते, हे निकालातून स्पष्ट होईल.

# नाना पाटेकर विराट कोहलीचा फॅन...

## विराटची विकेट गेल्यावर उपाशी राहणाऱ्या नाना पाटेकरांच्या मृत्यूनंतर कोहलीची सोशल मिडीयावर श्रद्धांजली पोस्ट

■ मुंबई : प्रतिनिधी

प्रसिद्ध दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांचं आज पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. नानांच्या निधनाने चाहते आणि सिनेसृष्टीसोबतच क्रीडा विश्वामध्येही शोककळा पसरली आहे. विशेष म्हणजे नानांचा आवडता खेळ क्रिकेट होता आणि त्यांचं संपूर्ण बालपण क्रिकेटच्या मैदानावर गेलं आहे. त्यांनी सुनील गावसकरांसारख्या अनेक दिग्गज खेळाडूंसोबत क्रिकेट खेळलं आहे. त्यांचं क्रिकेटवर मनापासून प्रेम होतं. तसेच त्यांचा आवडता खेळाडू हा स्टार खेळाडू विराट कोहली होता. जेव्हाही मैदानावर विराटची लवकर विकेट पडायची तेव्हा नाना नाराज व्हायचे, याबाबत नानांनी स्वत: एका मुलाखतीमध्ये सांगितलं होतं. तर आज नानांच्या याच आवडत्या विराटने त्यांना भावुक शब्दांमध्ये अखेरचा सलाम करत श्रद्धांजली अर्पण केली आहे.

नाना पाटेकरांच्या दु:खद निधनाची बातमी समोर आल्यानंतर विराट कोहलीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. विराटने पोस्टमध्ये नानांना भारतीय सिनेसृष्टीतील एक दिग्गज व्यक्तिमत्त्व म्हटलं आहे. तसेच त्यांचं काम आणि त्यांनी मागे सोडलेला वारसा हा पुढच्या अनेक पिढ्यांपर्यंत लक्षात राहील, अशी भावना विराटने व्यक्त केली आहे. सोबतच 'ओम शांती' म्हणत त्याने नानांना अखेरचा निरोप दिला.

विराट सोबत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने देखील नानांच्या निधनानंतर शोक व्यक्त केला आहे. सचिनने पोस्ट शेअर करत म्हटलं आहे की, नाना हे स्पष्टवक्ते आणि जमिनीवर पाय असलेली व्यक्ती होती. मराठी असो किंवा हिंदी असो नानांनी साकारलेल्या प्रत्येक भूमिकेमध्ये एक वेगळा जिवंतपणा आणला होता. तर आज नानांच्या जाण्याने खूप दु:ख झालं असून त्यांच्या कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींबद्दल संवेदना व्यक्त करत सचिनने श्रद्धांजली अर्पण केली.



# नाना पाटेकरांनी सुनील गावसकर, संदीप पाटलांसोबत गाजवलंय शिवाजी पार्क

■ मुंबई : प्रतिनिधी

ज्येष्ठ प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांचं हृदयविकाराच्या झटक्यामुळे दु:खद निधन झाले. नाना पाटेकरांच्या निधनामुळे आज संपूर्ण सिनेसृष्टी आणि चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. नानांचा पडद्यावरचा तो दरारा, दमदार असे डायलॉग आणि पडद्याबाहेरचा त्यांचा साधेपणा.. हे सगळं आता फक्त प्रत्येकाच्या आठवणीत राहणार आहे. नानांबाबत विशेष गोष्ट सांगायची झाली तर ते फक्त अभिनयापुरतेच मर्यादित नव्हते. आतापर्यंत आपण त्यांना एक अभिनेता म्हणून पाहिलं आहे. मात्र, तुम्हाला माहिती आहे का की, अभिनय क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी नानांनी क्रिकेटचं मैदान गाजवलं होतं.



### नाना पाटेकरांचा खेळापासून ते अभिनयापर्यंतच्या प्रवास

नाना पाटेकरांना अभिनयासोबतच क्रिकेट क्षेत्रात देखील मोठा रस होता. विशेष म्हणजे मुंबईमध्ये ज्या मैदानावर सुनील गावसकर यांच्यासारखे स्टार खेळाडू खेळायचे त्याच मैदानावर नानाही क्रिकेट खेळत असायचे. सुनील गावसकर यांना नाना त्यांचा आदर्श मानत होते. पण प्रश्न असा निर्माण होतो की नानांना क्रिकेट आवडायचं तरीही मग त्यांनी मैदान का सोडलं? त्यांनी अभिनय क्षेत्र का निवडलं? तर नानांच्या या खेळापासून ते अभिनयापर्यंतच्या प्रवासाबाबत जाणून घेऊया.

# भुवनेश्वर कुमार याच्या कमबॅकबाबत सुनील गावसकरांनी परफेक्ट ओळखलं

■ मुंबई : वृत्तसंस्था

मागील ४ वर्षांपासून भारतीय संघापासून दूर असलेल्या भुवनेश्वर कुमारची अखेर टीम इंडियामध्ये पुन्हा एकदा एन्ट्री झाली आहे. भुवनेश्वर कुमारची न्यूझीलंड विरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यामुळे २२ ऑक्टोबर पासून क्राइस्टचर्चमध्ये सुरू होणाऱ्या या मालिकेत भुवनेश्वर हा पुन्हा भारताच्या जर्सीत खेळताना दिसणार आहे. एकीकडे भुवनेश्वरच्या पदार्पणामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे. माजी खेळाडूंनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. दिग्गज खेळाडू सुनील गावसकरांनीही निवड समितीचे कौतुक करताना ते काय म्हणाले जाणून घ्या.

**सुनील गावसकर काय म्हणाले? :** भुवीची निवड योग्य असून कमिटीचे अभिनंदन, कारण त्यांनी वय न पाहता टॅलेंट पाहिलं. विशेष म्हणजे असा विचार फक्त फलंदाजांबाबतच न करता गोलंदाजांबाबतही केला. आयर्लंड, इंग्लंडमध्ये युवा खेळाडूंना संधी दिली पण यशस्वी ठरला नाही, त्यामुळेच त्यांनी आता अनुभवाला प्राधान्या दिले. न्यूझीलंडमध्ये चेंडू जास्त स्विंग होतो तिथे फक्त वेगच चालत नाहीतर स्विंग करण्याची क्षमताही भुवनेश्वरमध्ये असल्याचं सुनील गावसकर यांनी म्हटलं आहे. यामधील एक मुद्दा म्हणजे गावसकर म्हणाले यांनी फक्त फलंदाजांसारखा वयाचा विचार नाही केली. म्हणजेच निवड समिती विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना त्यांचे वय जास्त असूनही संधी देत आहे पण फक्त वयाचा आकडा न पाहता त्यांचा अनुभव आणि फॉर्म विचारात घेत आहे. निवड समितीने हाच विचार भुवनेश्वरची निवड करताना केल्याचं गावसकरांनी अधोरेखित केलं. भुवनेश्वर कुमारने भारतासाठी १२१ वनडे, ८७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने आणि २१ कसोटी सामने खेळले आहेत. तर नोव्हेंबर २०२२ मध्ये तो भारतासाठी अखेरचा खेळला होता. त्यानंतर आता तब्बल ४ वर्षांनंतर त्याने भारतीय संघात पुनरागमन केले आहे. भुनेश्वरच्या या कमबॅक मागे त्याची आयपीएलमधील दमदार कामगिरी महत्त्वाची ठरली आहे. आयपीएल २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूला ट्रॉफी जिंकून देण्यामध्ये भुवीने मोलाची भूमिका बजावली होती. या हंगामात त्याने २८ विकेट घेत तो स्पर्धेतील दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला होता. याच कामगिरीच्या जोरावर भुवीने भारतीय संघाचे तिकीट पुन्हा एकदा मिळवले आहे.

# वशिला नाही टॅलेंट! स्विंगचा बादशाह भुवनेश्वर कुमारचे भारतीय संघात कमबॅक?

■ मुंबई : वृत्तसंस्था

भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार याचे राष्ट्रीय क्रिकेट संघात पुनरागमन झाले आहे. आगामी पाच सामन्यांच्या टी-२० क्रिकेट मालिकेसाठी मंगळवारी जाहीर करण्यात आलेल्या संघात त्याचा समावेश करण्यात आला आहे. भुवनेश्वरने जवळपास चार वर्षांपूर्वी भारताकडून अखेरचा सामना खेळला होता. भारत-न्यूझीलंडमधील पहिली टी-२० लढत २२ ऑक्टोबरला खाइस्टचर्च येथे होणार आहे. भारतीय संघात त्याने नेमके कसे कमबॅक केले जाणून घ्या.

भारताचा स्विंगचा बादशाह भुवनेश्वर कुमार याचे भारतीय संघात कमबॅक होण्याआधीचा प्रवास काही सोपा नव्हता. भुवीने बाकी इतर कोणत्याही वादात न पडता आपल्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करत दमदार प्रदर्शनाने सर्वांचे लक्ष वेधले होते. आयपीएलमध्ये आरसीबीने २०२५ आणि २०२६ मध्ये विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरले होते. दोन्ही मोसमात भुवीने आरसीबीसाठी अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली होती. आयपीएलमध्ये आरसीबीने पहिल्यांदा ट्रॉफी जिंकली त्यावेळी भुवीने या मोसमात १४ सामन्यांत १७ विकेट घेतल्या होत्या. तर २०२६ मध्येसुद्धा आरसीबीने सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली त्यावेळी भुवीने २८ विकेट घेत पर्पल कॅप जिंकली होती. या दोन मोसमानंतर पुन्हा एकदा भुवीला संधी दिली जावी अशी चर्चा होऊ लागली होती. मात्र निवड समितीकडून त्याचे नाव घेतले जात नव्हते. पण भुवीने सोशल मीडियावर ना कुठे मुलाखतीमध्ये आपल्या निवडीबाबत कोणतेही विधान केले नाही. अनेक माजी खेळाडूंनी त्याला संघात जागा मिळायला हवी अशी जाहीरपणे मागणी केली. माजी निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर यांच्या पदावरून बाहेर पडल्यानंतर आणि प्रज्ञान ओझा यांची हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यानंतर बीसीसीआयने प्रथमच संघ जाहीर केला आहे. दुखापतीमुळे आशियाई क्रीडा स्पर्धेतून बाहेर पडलेल्या वरुण चक्रवर्तीचेही संघात पुनरागमन झाले आहे.



## आरसीबी ठरला 'सेतू'

भारत २२ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान न्यूझीलंडविरुद्ध पाच टी-२० सामने खेळणार आहे, टी-२० मालिकेनंतर भारत न्यूझीलंडविरुद्ध पाच सामन्यांची वनडे मालिका आणि दोन कसोटी सामनेही खेळणार आहे. भुवनेश्वरकुमार अखेरचा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना २२ नोव्हेंबर २०२२ रोजी खेळला आहे. ३६ वर्षीय भुवीने यंदा आयपीएलमध्ये १६ सामन्यांत २८ विकेट घेतल्या. २०२५च्या आयपीएलमध्ये त्याने १७विकेट घेतल्या होत्या. भारताचा टी-२० संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), वैभव सूर्यवंशी, ईशान किशन (यष्टिरक्षक), तिलक वर्मा (उपकर्णधार), अक्षर पटेल, शिवम दुबे, नितीशकुमार रेड्डी, नमन धीर, प्रिन्स यादव, मयंक यादव, अर्शदीपसिंग, भुवनेश्वरकुमार, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव. भारतीय टी-२० संघात भुवनेश्वर कुमारच्या निवडीबाबत तुम्हाला काय वाटते? त्याच्या पुनरागमनामुळे संघाची ताकद कशी वाढेल, याबाबत आपले मत कमेंट बॉक्समध्ये नोंदवा.

# भारतीय महिला क्रिकेट संघात फूट, हरमनप्रीत-स्मृतीमध्ये एकमत नव्हतं, ड्रेसिंग रुमचं वातावरण गरम, कॅप्टन्सीच्या हँडओव्हरवेळी चर्चांना उधाण

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

हरमनप्रीत कौरने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांतील कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारताच्या नेतृत्वात बदल करण्यात आले आहेत. अशात कॅप्टन्सीची धुरा महाराष्ट्राची लेक स्मृती मानधना हिच्या खांद्यावर दिली गेली नसती, तरच नवल. सोशल मीडियावर आपला निर्णय जाहीर करताना हरमनप्रीतने संघात मात्र खेळत राहणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. परंतु गेल्या काही काळापासून मावळती कर्णधार हरमनप्रीत आणि उगवती कर्णधार स्मृती यांच्यात बऱ्याच मुद्द्यांवर एकमत होत नव्हतं आणि त्यामुळे ड्रेसिंग रुममध्ये अस्वस्थतेचं वातावरण निर्माण झालं होतं, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

हरमनप्रीत कौरने कर्णधारपदाचा राजीनामा दिल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्मृती मानधनाकडे सोपवली जाणं, ही अत्यंत स्वाभाविक बाब आहे. मात्र देशातील सध्याची सर्वोत्तम फलंदाज असलेली ३० वर्षीय डावखुरी फलंदाज स्मृती मानधना हिला ही संधी मिळण्यास खूप उशीर झाला आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

२०१६ मध्ये पहिल्यांदा भारताचे नेतृत्व करणाऱ्या हरमनप्रीतने बीसीसीआयसोबतच्या आढावा बैठकीनंतर सर्व प्रकारच्या क्रिकेटमधील कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला. ३७ वर्षीय हरमनप्रीतने जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकून दिल्यानंतर आपल्या यशस्वी नेतृत्वाचा प्रवास एका उच्च टप्प्यावर संपवला.

### स्मृती मानधना बेस्ट ऑप्शन

हरमनप्रीतकडून कर्णधारपदाची धुरा स्वीकारण्यासाठी स्मृती मानधना हीच सर्वात योग्य निवड मानली जाते. २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या सलामीवीर स्मृतीने १० हजारांहून अधिक धावा करत खेळातील आघाडीच्या फलंदाजांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. कौशल्याच्या बाबतीत स्मृती मानधना नेहमीच इतरांपेक्षा खूप पुढे होती आणि आता तिने आपल्या अष्टपैलू खेळात आक्रमकतेची भर घालून आपल्या खेळाचा दर्जा आणखी उंचावला आहे. सिलेक्टर्सच्या धोरणांमुळे तिचा संयम सुटला होता, हे काही गुपित नव्हतं; कारण गेल्या वर्षी मायदेशात वनडे विश्वचषक जिंकून भारताने आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवला असतानाही निवडकर्त्यांनी कर्णधारपदाबाबत 'जैसे थे' स्थिती कायम ठेवणं पसंत केलं होतं. एका अलिकडील मुलाखतीत स्मृतीने भारताचे नेतृत्व करण्याची तयारी दर्शवली होती आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकानंतर भारताने आता त्याहून मोठ्या स्पर्धा जिंकण्याचे ध्येय ठेवले पाहिजे, असे मत व्यक्त केले होते. वनडे विश्वचषकातील यशानंतरच्या काळात भारताला सलग टी-२० विश्वचषकांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यातच बाहेर पडावे लागले होते, त्यामुळे विशेषतः या फॉरमॅटमधील नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.



### सिलेक्टर्सनी धाडस दाखवलं नाही

तरीही सिलेक्टर्सनी या कठीण निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे धाडस दाखवले नाही. मात्र गुवाहाटी येथे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हरमनप्रीतला हे स्पष्ट करण्यात आले की, नेतृत्वात बदल होणे अपरिहार्य आहे. अखेरीस तिने ही बाब स्वतःच्या हातात घेण्याचा निर्णय घेतला. हरमनप्रीत आणि स्मृती मानधना यांच्यात पूर्वी चांगले संबंध होते, परंतु नंतर कर्णधारपदावरुन त्यांच्यात मतभेद निर्माण झाल्याचे बोलले जाते. पीटीआय वृत्तसंस्थेने यासंदर्भात बातमी दिली आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# दुष्काळ निवारणासाठी जालना जिल्ह्यातील थेंब न् थेंब पाण्याचे नियोजन करा

## - पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे प्रशासनाला निर्देश

### - पिकांचे पंचनामे आठवडाभरात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

### - गावागावांत शेतकरी समुपदेशन कार्यक्रम राबविण्याचे निर्देश

### - सामुहिक विवाह, शेतकरी संवाद सारखे उपक्रम राबवा

**मुंबई :** जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत दुष्काळ परिस्थिती जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा, पीक नुकसान, पीकविमा आणि रोजगार हमीच्या कामांचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश पशुसंवर्धन व पर्यावरणमंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जालना जिल्हा प्रशासनाला दिले. उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी टँकरच्या प्रत्येक फेरीचे जीपीएसद्वारे नियंत्रण, टँकर ज्या ठिकाणी उभा राहतो तेथे जलपुनर्भरणाची व्यवस्था आणि नदी-नाल्यांचे खोलीकरण, पुनर्जीवन व जलस्त्रोतांच्या बळकटीकरणावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक घेतली. जालना जिल्ह्यातील पिकांचे पंचनामे, पीकविमा, धरणांतील पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चारा, टँकर, रोजगार हमी योजना तसेच शहरी भागातील पाणीपुरवठ्याचा यावेळी आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जालना महापालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा काटेकोर वापर करावा. जिल्हाधिकाऱ्यांनी पिण्याचे पाणी, धरणांतील जलसाठा, जलस्त्रोतांचे बळकटीकरण, टँकर व्यवस्थापन आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी सर्वंकष मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करून सादर करावी.

पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील ९५४ गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असून, सुमारे ६ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्र पंचनाम्याच्या कक्षेत आहे. आतापर्यंत सुमारे ६० टक्के गावांमध्ये पंचनामे पूर्ण झाले असून, क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ५३ टक्के आणि खातेदारांच्या दृष्टीने सुमारे ६१ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. जालना जिल्ह्यात सुमारे ५ लाख ८१ हजार खातेदार असून, त्यापैकी ३ लाख ५६ हजार खातेदारांचे पंचनामे झाले आहेत. आठवडाभरात पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे पाठविण्याचे आणि दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवावे.



■ **पंचनाम्यांत पारदर्शकतेवर भर**

पंचनामे तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या संयुक्त समितीमार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मागील वर्षीच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर यंदा पंचनाम्यांमध्ये पारदर्शकता आणि वस्तुनिष्ठता राखण्यावर भर देण्यात येत आहे. पीकविम्याबाबतही प्रशासनाला विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्ह्यात सुमारे दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी पीकविमा काढला असून सोयाबीनसाठी प्रस्तावित ३१२ प्रयोगांपैकी ९५ प्रयोग पूर्ण झाले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

■ **धरणांत मर्यादित पाणीसाठा**

जिल्ह्यातील प्रमुख, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये पाणीसाठा अत्यल्प असून त्याचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

"टँकर जिथे उभा राहतो, तिथे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. त्यामुळे टँकर भरण्याचे आणि वितरणाचे ठिकाण जीपीएसद्वारे निश्चित करा. ज्या ठिकाणी टँकरमधून पाणी दिले जाते, तिथे जलपुनर्भरणाची व्यवस्था करून पाण्याचा एक थेंबही वाया जाणार नाही, याची दक्षता घ्या," असे निर्देश पंकजा मुंडे यांनी दिले.

परवानगीशिवाय बोअरवेल घेण्यास कडक निर्बंध घालावेत. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी भरण्याच्या ठिकाणापासून वितरणापर्यंत त्याचे संनियंत्रण करावे. टँकर उभा राहणाऱ्या ठिकाणी जलतारा किंवा शोषखड्डा तयार करून सांडणारे पाणी भूजल पुनर्भरणासाठी वापरावे. जवळील विहीर अथवा हातपंपाच्या पुनर्भरणाचीही व्यवस्था करावी, असे निर्देश पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी दिले.

पाणी वापरात दहा टक्के कपातीच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी. बांधकामे, क्रशर, रस्ते आणि महामार्गांच्या कामांसाठी पिण्यायोग्य किंवा शुद्ध पाणी वापरले जाणार नाही, यासाठी आवश्यक नियंत्रण ठेवावे. उद्योगांनी शक्य तेथे प्रक्रिया केलेल्या किंवा पुनर्वापरयोग्य पाण्याचा वापर करावा. खासगी बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर नियंत्रित करण्याबाबत शासनस्तरावरील धोरणात्मक निर्णयासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

■ **चारा नियोजन योग्य प्रकारे करा**

प्रत्येक तालुक्यात सुरू केलेल्या चारा साक्षरता अभियानातून मुरघास, हायड्रोपोनिक्स, अझोला आणि चाऱ्याच्या योग्य वापराची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना द्यावीत. गाळपेर क्षेत्राचा चारा उत्पादनासाठी उपयोग करावा. आवश्यकता भासल्यास गावपातळीवर चारा डेपो सुरू करून टॅग केलेल्या जनावरांच्या संख्येनुसार चारा आणि पाण्याचे नियोजन करावे, असे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी निर्देशित केले.

■ **'रोजगार हमी'तून जलसंधारणाला प्राधान्य**

दुष्काळाच्या काळात रोजगार उपलब्ध करून देतानाच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतील कामांचा जलसंधारणाशी संबंध जोडण्याच्या सूचना पालकमंत्री मुंडे यांनी देण्यात आल्या. नदी-नाल्यांचे खोलीकरण, पुनर्जीवन, जलस्त्रोतांचे बळकटीकरण आणि गाळ काढण्याच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश पंकजा मुंडे यांनी दिले.

"पुढील पावसाळ्यातही दुष्काळाची शक्यता गृहीत धरून आत्तापासूनच नियोजन करा. येणारा प्रत्येक पाण्याचा थेंब अडवला आणि जिरवला पाहिजे," असे त्यांनी स्पष्ट केले.

■ **विहिरी, तलावांचे ऑडिट**

दुर्लक्षित व गाळाने भरलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांची स्वच्छता व पुनर्बांधणी करण्याचेही त्यांनी यावेळी दिले. नैसर्गिक तसेच कृत्रिम तलावांचेही ऑडिट करून आगामी काळातील जलसाठ्यासाठी आवश्यक कामांचे नियोजन करण्यासही त्यांनी सांगितले.

नगरपालिकांच्या पाणीपुरवठ्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. थकीत वीजबिलामुळे बंद असलेली खडकपूर्णा पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येईल. पाणीटंचाईची तीव्र शक्यता असलेल्या गावांमध्ये रिचार्ज शाफ्ट, बंधारे आणि नाला खोलीकरणाच्या कामांना टप्प्याटप्प्याने निधी देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

■ **शेतकरी समुपदेशनावर विशेष भर**

दुष्काळामुळे शेतकऱ्यांवर निर्माण होणारा मानसिक ताण लक्षात घेता गावागावांत शेतकरी समुपदेशन कार्यक्रम राबविण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. ग्रामसेवक, तलाठी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि सरपंच यांनी संवेदनशील कुटुंबांवर विशेष लक्ष ठेवावे, असे त्यांनी सांगितले.

"दुष्काळाच्या परिस्थितीत केवळ पाणी आणि चाऱ्याची व्यवस्था पुरेशी नाही. शेतकऱ्यांना विश्वास देणे आणि त्यांच्याशी संवाद साधणेही तितकेच महत्त्वाचे आहे," असे पालकमंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

■ **२५० गावांचा 'दत्तक' योजनेत समावेश**

पाणीटंचाईची तीव्रता असलेल्या गावांसाठी विविध संस्था, व्यक्ती, मंदिरे, रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून गाव दत्तक घेण्याची संकल्पना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी मांडली. सुमारे २५० गावांसाठी अशा स्वरूपाचे नियोजन करण्यात येत असून, दुष्काळग्रस्त कुटुंबांशी संवाद साधणे, आवश्यक मदत उपलब्ध करून देणे आणि दिवाळीच्या काळात सामाजिक आधार देण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

ही संकल्पना उत्तम असून आपण स्वतःही एक गाव दत्तक घेणार असल्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# कुणबी–मराठा जात प्रमाणपत्रासाठी पिंपळगाव गाढे येथील नागरिकांचे आमरण उपोषण

**परळी वैजनाथ**

कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र मिळावे, यासाठी पिंपळगाव गाढे (ता. परळी वैजनाथ) येथील नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे. यासंदर्भात भगवान प्रकाश राडकर, अजित वसंतराव सोनवणे, प्रमोद अमृतराव घुगे यांच्यासह नागरिकांनी तहसीलदार तथा संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पिंपळगाव गाढे येथील अनेक नागरिक कुणबी–मराठा समाजातील असून, त्यांच्या पूर्वजांच्या नावांची नोंद महाराष्ट्र शासनाच्या बीड जिल्ह्यातील डिजिटल शासकीय सेवा, सरकारी वेबसाईट तसेच ई-गव्हर्नन्स प्रकल्पाशी संबंधित नोंदींमध्ये कुणबी म्हणून आढळून येत आहे. तसेच गावच्या पटवारीकडे मोडी लिपीमध्ये नोंद असलेले पूर्वज कुणबी असल्याचे प्रमाणपत्रही असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पुराव्यांची प्रत अर्जासोबत जोडूनही कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सन १९३२ च्या नोंदीचा पुरावा लक्षात घेऊन यापूर्वी कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यात आल्याचेही निवेदनात नमूद आहे. तसेच मराठा–कुणबी जातीच्या प्रमाणपत्राची जातपडताळणी झालेली असल्याने तो पुरावा ग्राह्य धरून पात्र अर्जदारांना कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, सादर केलेले सर्व अर्ज १० ऑक्टोबर २०२६ पर्यंत मंजूर करावेत, अन्यथा १२ ऑक्टोबर २०२६ पासून कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सामाजिक न्यायाची भावना ठेवून कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र देऊन संबंधितांना उपोषण करण्याची वेळ येऊ नये, अशी मागणी भगवान प्रकाश राडकर, अजित वसंतराव सोनवणे, प्रमोद अच्युतराव सोनवणे व इतर अर्जदार नागरिकांनी केली आहे.



# दुष्काळजन्य परिस्थितीमुळे हाळम फेस्टिवल साध्या पद्धतीने साजरा होणार : माधव मुंडे

## कन्यादानासाठी 10 हजाराची मदत

**परळी** | परळी तालुक्यात ग्रामीण भागातला वाजलेला व अखंडपणे चालणारा हाळम फेस्टिवल हा दुष्काळजन्य परिस्थितीमुळे साध्या पद्धतीने साजरा करणार असल्याची माहिती संस्थापक युवा नेते माधवराव मुंडे यांनी दिली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की परळी तालुक्यातील हळू या ग्रामीण भागातील गावात 21 वर्षापासून अखंडपणे नवरात्र उत्सवामध्ये दुर्गादेवीची स्थापना करून शैक्षणिक सांस्कृतिक प्रबोधन आरोग्य यासारखे विविध सामाजिक उपक्रम राबवून हळम फेस्टिवल राबवल्या जातो या फेस्टिवलच्या माध्यमातून समाज उपयोगी उपक्रम राबवून एक वेगळा आदर्श पायंडा परळी तालुक्यात घालून दिलेला आहे मात्र यावर्षी प्रचंड प्रमाणात दुष्काळजन्य परिस्थिती असल्यामुळे सर्व खर्चांना फाटा देऊन हा महोत्सव अगदी साध्या पद्धतीने राबवणार असल्याची माहिती दिली आहे. तसेच यावर्षीच्या विजयादशमी पासून ते पुढच्या वर्षीच्या विजयादशमी पर्यंत गावातील शेतकऱ्यांच्या मुलींच्या कन्यादानासाठी दहा हजार रुपये ची आर्थिक मदत केली जाणार असल्याची माहिती संस्थापक युवा नेते माधवराव मुंडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



■ **सेवाधर्मी -माधवराव मुंडे**

कोणत्याही राजकीय पदावर कार्यरत नसतानाही माधवराव मुंडे हे गेल्या 21 वर्षापासून हा महोत्सव साजरा करतात आणि गाव आणि परिसरातील विद्यार्थ्यांसाठी स्कूल आयटीआय कॉलेज काढून शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरी करताना दिसत आहेत समाजकार्य करताना कोणत्यातरी मोठ्या पदावरच असावं असं काही नाही हे त्यांच्या कार्यातून दिसत आहे

# वारली समाज उन्नती मंडळाकडून गुणवंत विध्यार्थी गुणगौरव सोहळा

## पद्मश्री भिकल्या धिंडा व संसदरत्न खासदार डॉ. हेमंत सवरा यांचाही विशेष सत्कार करण्यात आला

**जव्हार (वा )भगवान जाबर**

शिक्षण, संस्कार,समाजसेवा आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीमध्ये विशेष योगदान देणाऱ्या गुणवंत विध्यार्थी तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या कर्तृत्वान व्यक्तींचा गौरवासाठी वारली समाज उन्नती मंडळ जव्हार तालुका यांच्या वतीने गुण गौरव सोहळा पार पडला.

जव्हारच्या प्रगती प्रतिष्ठान प्रारंगणात पार पडला असून गुण गौरव सोहळ्यात २०२५- २६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी व १२वी मध्ये यश संपादन केलेल्या विध्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्वान सन्मान केला गेला.






विध्यार्थांच्या यशाला प्रोत्साहन देणे,त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे बोलले जात आहे.या सोहळ्यात पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केलेल्या भिकल्या धिंडा आणि पालघर लोकसभेचे खासदार संसदरत्न डॉ. हेमंत सवरा यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला. समाजाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांच्या उपस्थित गुणवंत विध्यार्थी आणि कर्तृत्वान व्यक्तींचा गौरव झाल्याने या कार्यक्रमला विशेष महत्व प्राप्त झाले

या कार्यक्रमासाठी माजी पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम,पालघर जिल्हा शल्वचिकित्सक डॉ. रामदास मराड,सजन खुताडे,सोमा तुंबडा, भाऊ नावळे, रामदास कुरबुडे,रवी बुधर,सखाराम वड, वातास सर आदी व्यक्ती समाजाच्या प्रेरणास्थान म्हणून विशेष उपस्थिती लाभली.

या गुणगौरव सोहळ्याची रूपरेषा वारली समाज उन्नती मंडळ जव्हार तालुका अध्यक्ष पांडुरंग पिलाना, सचिव दामोदर थाळकर व उपाध्यक्ष ईश्वर बांगड यांनी सांभाळली असून जव्हार तालुका कार्यकरणी व पदाधिकार्यांच्या सहभागातून सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शनिवार, 10 ऑक्टोबर 2026

# मराठी भाषेला समृद्ध वारसा लाभला आहे - प्रा.डॉ.महेश खरात

## मातीतलं बीज बाप माझा काव्यसंग्रहात ग्रामीण भारताचे प्रतिबिंब - रानबा गायकवाड





**परळी प्रतिनिधी**

माय मराठी भाषेला अडीच हजार वर्षांचा समृद्ध वारसा लाभला आहे.अनेक संतांनी आणि साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली असे प्रतिपादन राजमाता अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरचे मराठी विभाग प्रमुख, साहित्यिक व प्रसिद्ध समिक्षक प्रा. डॉ.महेश खरात यांनी केले.तर प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रसिद्ध साहित्यिक, पत्रकार रानबा गायकवाड म्हणाले की,प्रा.रामेश्वर चाटे यांचा मातीतलं बीज बाप माझा हा काव्यसंग्रह म्हणजे ग्रामीण आणि कृषीप्रधान भारताचे प्रतिनिधित्व करणारा होय. मराठी राजभाषा गौरव दिना निमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयातील गोपीनाथराव मुंडे सभागृहात संपन्न झालेल्या या काव्यसंग्रह प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. जी. राठोड होते तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, लातूर येथील शाहू महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. संभाजी पाटील, भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ .माधव रोडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विभाग सिनेट सदस्य प्राध्यापक डॉक्टर पी. एल. कराड, प्राध्यापक रामेश्वर चाटे तसेच वैद्यनाथ महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख व माजी प्राचार्य डॉ.अर्चना सावंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा डॉ महेश खरात म्हणाले की,मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने आता मराठी भाषा व मराठी साहित्य यावर केंद्र आणि राज्य सरकार विशेष निधीचे तरतूद करेल यामुळे साहित्य निर्मितीला चालना मिळेल याप्रसंगी प्राचार्य आर जी .राठोड,जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड प्राध्यापक डॉक्टर माधव रोडे, प्राध्यापक रामेश्वर चाटे यांनी आपले विचार मांडले. प्रा. माधव रोडे व प्रा. अर्चना सावंत यांनी काव्यसंग्रहातील काही कवितांचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक अर्चना सावंत यांनी केले सुत्रसंचलन डॉक्टर श्रीहरी गुट्टे,तर आभार डॉ.एम.जी.लांडगे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तात्या–आभई आदर्श प्रतिष्ठानतर्फे उद्या शनिवारी सहा मान्यवरांचा गौरव

## वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार - ॲड. राजेंद्रप्रसाद धायगुडे

**अंबाजोगाई प्रतिनिधी:-**













“काही माणसे पुरस्काराने मोठी होत नाहीत; तर त्यांच्या कार्यामुळे पुरस्काराचीच प्रतिष्ठा वाढते. समाजासाठी प्रामाणिकपणे, निस्वार्थ भावनेने आणि सातत्याने योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव होणे ही समाजाची जबाबदारी आहे,” या भावनेतून तात्या–आभई आदर्श प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने कै. ॲड. अण्णासाहेब लोमटे (नवाब) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तात्या–आभई आदर्श गौरव पुरस्कार–२०२६ प्रदान करण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा मान्यवरांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली असून, त्यांचा उद्या शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात गौरव करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे ॲड. राजेंद्रप्रसाद धायगुडे यांनी दिली.

विधी, आरोग्य, शिक्षण, पत्रकारिता, समाजसेवा आणि संघर्षमय जीवनप्रवास अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्काराच्या माध्यमातून केवळ व्यक्तींचा सन्मान न करता त्यांच्या कार्यामागील सामाजिक बांधिलकी, संघर्ष, प्रामाणिकपणा आणि समाजहिताची भावना अधोरेखित करण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले.

विधी सेवा गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुरेश राजारामपंत सोनवळकर, अंबाजोगाई यांची निवड करण्यात आली आहे. सन १९८६ पासून ते वकिली क्षेत्रात कार्यरत असून, न्याय, प्रामाणिकपणा, कायद्याचे भान आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना त्यांनी आपल्या कार्यातून सातत्याने महत्त्व दिले आहे. विधी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि समाजाप्रती असलेल्या त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

आरोग्य सेवा गौरव पुरस्कार बालहृदय उपचार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. पंकज भास्करराव सुगावकर (जोशी), पुणे यांना प्रदान करण्यात येणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग अनेक बालकांच्या उपचारासाठी करताना त्यांच्या कुटुंबांना मानसिक आधार आणि आशेचा किरण देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. बालहृदय उपचार क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

शिक्षण सेवा गौरव पुरस्कार प्रा. डॉ. मुरलीधर अत्युतराव लहाडे, बनसारोळा यांना प्रदान करण्यात येणार आहे. सामान्य परिस्थितीतून पुढे येत ज्ञानदानाला समाजसेवेचे व्रत मानणाऱ्या प्रा. डॉ. लहाडे यांनी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देण्याचे आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देण्याचे कार्य केले आहे. शिक्षण हे केवळ नोकरीचे साधन नसून समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

पत्रकारिता सेवा गौरव पुरस्कार पत्रकार परमेश्वर भगवानराव गिते, अंबाजोगाई यांना प्रदान करण्यात येणार आहे. अंबाजोगाईच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक जीवनातील विविध घडामोडींना आपल्या लेखणीतून व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून सामाजिक प्रश्न, नागरिकांच्या समस्या, विकासाचे विषय आणि सार्वजनिक जीवनातील घडामोडींना वृत्तपत्राच्या माध्यमातून स्थान देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

समाजसेवा व प्रशासकीय कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गजानन तात्यासाहेब चौगुले यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. प्रदीर्घ शासकीय सेवेसोबतच युवकांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अनेक कुटुंबांना स्वावलंबी होण्यासाठी मदत करत सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य त्यांनी केले आहे. प्रशासनातील अनुभवाचा उपयोग समाजहितासाठी करण्याच्या त्यांच्या योगदानाचा या निमित्ताने सन्मान करण्यात येणार आहे.

तर विशेष सन्मान बबनराव लक्ष्मणराव बंडगर, अंबाजोगाई यांना प्रदान करण्यात येणार आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत स्वतःचे विश्व उभे करणाऱ्या बंडगर यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी आहे. संघर्ष, जिद्द, मेहनत आणि सामाजिक जाणीव यांच्या बळावर त्यांनी सामाजिक व सार्वजनिक जीवनात आपले योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभे राहण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनप्रवासातून मिळते, त्यामुळे त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

तात्या–आभई आदर्श प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या या पुरस्कारांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींची एकाच व्यासपीठावर होणारी उपस्थिती. समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या कार्याची समाजाला ओळख व्हावी आणि नव्या पिढीसमोर त्यांच्या कार्याचा आदर्श निर्माण व्हावा, हा पुरस्कारामागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.

कै. ॲड. अण्णासाहेब लोमटे (नवाब) यांच्या स्मृतीला अभिवादन करत त्यांच्या सामाजिक विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढे नेण्याच्या उद्देशाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुरस्कार स्वीकारणाऱ्या सहाही मान्यवरांच्या कार्याचा गौरव करताना समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देण्याची परंपरा अधिक दृढ होईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

तात्या–आभई आदर्श गौरव पुरस्कार–२०२६ वितरण सोहळा उद्या रविवारी, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी स्व. विलासराव देशमुख न.प. सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास नागरिक, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, विधी, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तात्या–आभई आदर्श प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा द्वितीय गळीत हंगामाचा रविवारी शुभारंभ



**लातूर** | लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर परिसरात शेतकऱ्यांच्या हितासाठी दिमाखाने उभा असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ॲग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याचा द्वितीय गळीत हंगामाचा शुभारंभ घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावर रविवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२० रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार रामेश्वर परिसरात संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ॲग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली असून गेल्या वेळी गळीत हंगाम अत्यंत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला. या कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची स्वप्नपूर्ती होत असून चालू वर्षीच्या गळीत हंगामासाठी येत्या ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

गळीत हंगाम शुभारंभ परमपूज्य विद्यानंद सागर महाराज बोपला, ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर, आणि ह.भ.प. बाबा महाराज बोराडे काटगावकर यांच्या शुभहस्ते होत असून त्यांचे आशीर्वाद याप्रसंगी लाभणार आहेत.

श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळ्यास कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आणि कारखान्याच्या भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तथा ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय तुळशीराम अण्णा कराड, चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.



# केंद्रीय युवक महोत्सवात मानसी अलाटची यशस्वी भरारी!

**परळी वैजनाथ** | छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. मानसी अलाट हिने मिमिक्री या कलाप्रकारात तृतीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयात मानसीसह महोत्सवात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते हृद्य सत्कार करण्यात आला.

५ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या केंद्रीय युवक महोत्सवात बीड, धाराशिव, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या चार जिल्ह्यांतील नामांकित महाविद्यालयांचे स्पर्धक सहभागी झाले होते. विविध कलाप्रकारांत कौशल्य सिद्ध करणाऱ्या स्पर्धकांमध्ये कु. मानसी अलाट हिने आपल्या मिमिक्री कलेच्या जोरावर तृतीय पारितोषिक मिळविले. महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभात सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री नम्रता संभेराव यांच्या हस्ते मानसीला गौरविण्यात आले. यावेळी अभिनेत्री नम्रता संभेराव यांनी मानसीला मंचावर बोलावून तिच्यासोबत नृत्यही केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, सुप्रसिद्ध पार्श्वगायक रवींद्र खोमणे यांच्यासह विविध मान्यवरांची या वेळी उपस्थिती होती.